दि.१९/०७/२०२३

## प्रेस नोट

प्राथमिक आरोग्य केंद्र, पिवळी पथक, पिवळीगाव ता.शहापूर जि.ठाणे येथील वैदयकिय अधिकारी, डॉ.रेखा श्रावण सोनावणे यांना लाच स्विकारतांना अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| अँन्टी करप्शन ब्युरो/घटक | :– | ठाणे युनिट |
| पोलीस स्टेशन डायरी नोंद क्रमांक | :– | वासिंद पोलीस स्टेशन, ठाणेग्रामिण<br>पोलीस स्टेशन डायरी नोंद क्र.२५/१७.१४ वा.दि.१९.०७.२०२३ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :– | लोकसेविका डॉ.रेखा श्रावण सोनावणे वय:– ४४ वर्षे, पद:– वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, पिवळी पथक, पिवळीगाव ता.शहापूर जि.ठाणे (वर्ग– २) |
| मागितलेली लाचेची रक्कम | :– | ११,०००/–रू |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | ११,०००/–रू. |
| थोडक्यात हकीगत | :– | लोकसेविका डॉ.रेखा श्रावण सोनावणे, वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, पिवळी पथक, पिवळीगाव ता.शहापूर जि.ठाणे यांनी तक्रारदार यांना शासनाकडून आरोग्य केंद्रास मंजुर झालेले अनुदान रक्कम रू २२,०००/– ही बेकायेदशीरित्या बिले सादर करुन काढण्यास सांगून सदर रक्कमेतील अर्धी रक्कम रु.११,०००/– त्यांना देण्यास सांगितले. सदरचे बेकायदेशी काम करण्यास तक्रारदार यांनी नकार दिल्याने आलोसे डॉ.रेखा सोनावणे यांनी तक्रारदार यांचे वार्षिक गोपनिय अहवाला (एसीआर) खराब करीन तसेच पिवळी पथकामध्ये व्यवस्थित काम करीत नाही म्हणून वरिष्ठांकडे खोटा अहवाल सादर करीन असे सांगून तक्रादार यांचा वार्षिक गोपनिय अहवाला (एसीआर) खराब न करण्यासाठी त्यांचेकडे रु. ११,०००/– लाचेची मागणी केली.<br>परंतु तक्रारदार यांना लोकसेविका डॉ.रेखा सोनावणे यांना लाच दयावयाची नसल्याने त्यांनी दिनांक १८/०७/२०२३ रोजी लोकसेविका डॉ.रेखा सोनावणे हया ११,०००/–रू. लाचेची मागणी करीत असल्याबाबत अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात लेखी तक्रार नोंदवली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.१९.०७.२०२३ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेविका डॉ.रेखा श्रावण सोनावणे, वैदयकिय अधिकारी वर्ग–२ यांनी तक्रारदार यांचेकडे पंच साक्षीदार यांचेसमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर लगेचच लाचेच्या सापळयाचे आयोजन केले असता, लोकसेविका डॉ.रेखा श्रावण सोनावणे यांना प्राथमिक आरोग्य केंद्र, पिवळी गाव ता.शहापूर जि.ठाणे या कार्यालयातच तक्रारदार यांचेकडून रु. ११,०००/– (अकरा हजार रुपये) इतकी लाचेची रक्कम स्विकारली असता, रंगेहाथ पकडून ताब्यात घेण्यात आले असून लाचेची रक्कम लोकसेविका डॉ.रेखा सोनावणे यांचेकडून हस्तगत करण्यात आली आहे. |
| | | |

**मार्गदर्शन अधिकारी–मा.श्री.सुनिल लोखंडे, सो.पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

**मा.श्री.अनिल घेरडीकर सो.अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र,ठाणे**

अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

१) संपर्क पत्ता :–लाप्रवि, ठाणे मध्यवर्ती कारागृहा समोर, ठाणे पश्चिम ४००६०१
२) संकेत स्थळ :–acbmaharashtra@mahapolice.gov.in
३) ई–मेल आयडी :–spacbthane@mahapolice.gov.in
४) अॅप्लीकेशन :–acbmaharashtra.net
५) टोल फ्री क्र. :– १०६४
६) दुरध्वनी क्रमांक :–०२२–२०८१३५९९

पोलीस निरीक्षक, अँन्टी करप्शन स्टेशन ठाणे

(स्वप्निल नुईकर)
पोलीस निरीक्षक
अँटी करप्शन ब्युरो, ठाणे.